## दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, मुर्तिजापूर, जि. अकोला यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी ए. जी. तांबोळी)

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ४१३/२०२५

CNR-MHAK0900027332025

**अर्जदारः–** १. चेतन अशोकराव मुगल,
वय ३९ वर्ष, व्यवसाय – शेती,

२. चंद्रशेखर अशोक मुगल,
वय ३४ वर्ष, व्यवसाय – शेती,

३. श्रीमती मथुराबाई प्रभाकर मुगल,
वय ८२ वर्ष, व्यवसाय – घरकाम
१ ते ३ रा.बापोरी, ता. मुर्तिजापूर,
जि. अकोला.

**.. वि ..**

**गैरअर्जदारः–** .......... निरंक ..............

**आदेश नि.क्र. ०१ वर**

(१७/०३/२०२६)

मुंबई नियमन कायदा (Bombay Regulation Act), १८२७ चे कलम २ व १ नुसार वारसा दाखला मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**२.** अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील तसेच अर्जदार क्र. ३ यांचा मुलगा नामे अशोक प्रभाकर मुगल हे दि. १९.११.२०२५ रोजी बापोरी, ता. मुर्तिजापूर जि. अकोला येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ व २ यांची आई व अर्जदार क्र. ३ ची सून नामे पद्मा अशोकराव मुगल ह्या दि. १३.०२.२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार क्र.१ व २ हे मयत अशोक प्रभाकर मुगल व पद्मा अशोकराव

मुगल यांचे अपत्य आहेत. तसेच अर्जदार क्र. ३ ही मयत अशोक प्रभाकर मुगल यांची आई आहे. मयतास अर्जदार क्र. १ ते ३ व्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत अशोक प्रभाकर मुगल व मयत पद्मा अशोकराव मुगल यांच्या मृत्यूनंतर अर्जदारांना ते मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची आवश्यकता खाजगी व शासकिय कामाकरीता आहे. म्हणून त्यांनी प्रस्तुत अर्ज न्यायालयात दाखल करुन अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत अशोक प्रभाकर मुगल व मयत पद्मा अशोकराव मुगल यांचे ते कायदेशीर वारस आहेत अशा वारस दाखल्याची मागणी केली.

**३.** प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर दि. २६.१२.२०२५ रोजीच्या 'दैनिक सायरन' (नि.क्र.१५) च्या अंकातुन जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले व प्रस्तुत अर्जावर कोणाचा आक्षेप असल्यास हजर राहुन नोंदवण्याबाबत आवाहन करण्यात आले मात्र विहीत मुदतीत कोणीही आक्षेप नोंदवला नाही.

**४.** अर्जदारांनी त्यांच्या कथनापुष्टयर्थ अर्जदार क्रमांक २ चे सरतपासाचे शपथपत्र (निशाणी क्रमांक ८) वर दाखल केले. मयत अशोक प्रभाकर मुगल व पद्मा अशोकराव मुगल, यांचा मृत्युचा दाखला (निशाणी क्रमांक ९ व १०) वर दाखल केले आहेत. पोलीस पाटील, यांनी अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत अशोक प्रभाकर मुगल यांचे वारस असल्याबाबत अहवाल (नि.क्र.२०) वर दाखल करण्यात आला आहे. अर्जदारांनी अर्जदार क्र. १ ते ३ यांचे आधार कार्डच्या पडताळणी केलेल्या झेरॉक्स प्रती व शिधा पत्रिकेची पडताळणी केलेली प्रत अभिलेखावर दाखल केल्या आहेत. अर्जदारांनी दाखल केलेल्या त्यांच्या आधारकार्डाच्या झेरॉक्स प्रतिंवरुन व अभिलेखावरील विना आव्हानीत पुराव्यावरुन असे दिसून येते की, मयत अशोक प्रभाकर मुगल यांचे अर्जदार क्र १ व २ मुले, अर्जदार क्र. ३ आई आहे. अर्जदार क्र. २ यांच्या पुराव्यातुन अर्जदारांच्या कथनाला दुजोरा मिळतो. महत्वाचे म्हणजे त्या पुराव्याला कोणीच आव्हान दिलेले नाही. त्यामुळे त्यावर अविश्वास दाखवण्याचे कारणच नाही. नमुद करण्यासारखी बाब म्हणजे अर्जदार क्र १ ते ३ यांना मयत अशोक प्रभाकर मुगल यांचे कायदेशीर वारस घोषीत केल्यास त्यांना मयताच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर कोणताही हक्क प्रस्तुत जाहिरनाम्या आधारे प्राप्त होत नाही. प्रस्तुत जाहिरनाम्याआधारे अर्जदार क्र. १ ते ३ हे

मयत अशोक प्रभाकर मुगल यांचे औपचारीक कायदेशीर वारस घोषीत करण्यास कोणतीही कायदेशीर अडचण दिसुन येत नाही. त्यामुळे अर्जदारांची वारसा दाखला मिळण्याची मागणी मंजुर करणे योग्य व न्यायोचित असल्याचे मला वाटते. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार नं. १ ते ३ यांचे नावे ते मयत अशोक प्रभाकर मुगल यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत असा वारसा दाखला मुंबई नियमन कायदा (Bombay Regulation Act)१८२७ चे कलम २ व १ प्रमाणे देण्यात यावा.

३. सदर वारस दाखल्याचा उपयोग हा अर्जदारांनी अर्जात नमुद केलेल्या कारणासाठी करावा.

४. अर्जदारांनी नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरावा.

५. संचिका बंद करण्यात येते.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला. )

TAMBOLI ASIF GULAMDASTGIR

Digitally signed by TAMBOLI ASIF GULAMDASTGIR
Date: 2026.03.17 15:54:40 +0530

दि. १७.०३.२०२६

( ए. जी. तांबोळी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मुर्तिजापूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Steno | Ku. H.D.Mali |
| Name of the Court | CJJD & JMFC, Murtizapur |
| Date of Order & Judgment | 17.03.2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. on | 17.03.2026 |
| Order/Judgment uploaded on | 18.03.2026 |